सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग.

(सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ६.)

# मुंबई खोती नाहीशी करण्याबाबत अधिनियम, १९४९.

*( दिनांक १९ सप्टेंबर, २०११ पर्यंत सुधारित. )*

---

## ( BOMBAY ACT NO. VI OF 1950 )

## (The Bombay Khoti Abolition Act, 1949.)

*(As modified up to 19th September, 2011.)*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, वाई, यांनी भारतामध्ये मुद्रित केले आणि संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशने, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांनी प्रसिद्ध केले.
२००७

(किंमत रु. ५.००)

## मुंबई खोती नाहीशी करण्याबाबत अधिनियम, १९४९

(सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ६)

### अनुक्रमणिका

प्रस्तावना


| कलमे | | पाने |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ. ... ... ... ... | १ |
| २. | व्याख्या. ... ... ... ... ... | १ |
| ३. | खोती सत्ताप्रकार नाहीसा करणे. ... ... ... ... | ३ |
| ४. | खोत, धारेकरी व कुळे ही खातेदार म्हणून असतील. ... ... | ४ |
| ५. | खोताच्या देण्यांचे रूपांतरित मूल्य. ... ... ... ... | ४ |
| ६. | भोगाधिकार मूल्य किंवा रूपांतरित मूल्य हे जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करता येणे. ... ... ... ... | ५ |
| ७. | खोताने हिशेब वगैरे प्राधिकृत अधिकाऱ्याच्या स्वाधीन करणे. ... ... | ५ |
| ८. | लागवडीस न आणलेल्या व पडीत जमिनी आणि जमीन महसूल संहितेच्या कलम ३७ मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रकारची सर्व मालमत्ता शासनाकडे निहित होणे. | ६ |
| ९. | जमीन परत मिळण्याचा खोताचा हक्क नष्ट करणे. ... ... ... | ६ |
| १०. | झाडे वगैरे संबंधी हक्क. ... ... ... ... | ६ |
| ११. | जमीन महसूल अधिनियम खोती गावांतील जमिनींना लागू करणे. ... ... | ७ |
| १२. | जमिनीतील कोणताही हक्क नष्ट केल्याबद्दल किंवा त्यात फेरबदल केल्याबद्दल नुकसानभरपाई देण्याची रीत. ... ... ... ... | ७ |
| १३. | मुदतमर्यादा. ... ... ... ... ... | ९ |
| १४. | न्यायालय शुल्क. ... ... ... ... ... | ९ |
| १४अ. | सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ९३, याच्या प्रारंभापूर्वी केलेल्या निवाड्यांच्या संबंधांत पुनरीक्षणाचे अधिकार. ... ... ... | १० |
| १५. | सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६७, याच्या तरतुदी खोत व कुळे यांच्या संबंधांस लागू असणे. ... ... ... ... | १० |
| १६. | नियम. ... ... ... ... ... | १० |
| १७. | निरसन. ... ... ... ... ... | १० |
| अनुसूची | ... ... ... ... ... ... | ११ |

# सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ६[१].

(मुंबई खोती नाहीशी करण्याबाबत अधिनियम, १९४९.)

[३ एप्रिल, १९५०]

या अधिनियमात पुढील अधिनियम व आदेश या अन्वये अनुकूलन, रूपभेद व सुधारणा करण्यात आल्या आहेत :

सन १९५० चा मुंबई अधिनियम १८.
सन १९५२ चा मुंबई अधिनियम ३.
सन १९५३ चा मुंबई अधिनियम ३८.
सन १९५३ चा मुंबई अधिनियम ६५.
सन १९५८ चा मुंबई अधिनियम ९३.
महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०.
सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम ४३.

## [२] [मुंबई राज्यातील] खोती सत्ताप्रकार नाहीसा करण्याबाबत अधिनियम.

**ज्याअर्थी,** [३] [ महाराष्ट्र राज्याच्या मुंबई प्रदेशातील ] *रत्नागिरी व † कुलाबा या जिल्ह्यांत चालू असलेला खोती सत्ताप्रकार नाहीसा करणे व यात यापुढे दिलेल्या काही परिणामभूत व आनुषंगिक गोष्टींसाठी तरतूद करणे इष्ट आहे; **त्याअर्थी**, याअन्वये पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

१. (१) ह्या अधिनियमास "मुंबई खोती नाहीशी करण्याबाबत अधिनियम, १९४९", असे म्हणावे. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

(२) तो, दिनांक ३० जुलै, १९४८ च्या निकटपूर्वी रचना करण्यात आल्याप्रमाणे असलेल्या रत्नागिरी व कुलाबा या जिल्ह्यांना लागू आहे.

(३) तो, [४] [ राज्य सरकार ] शासकीय **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे जी तारीख निर्दिष्ट करील त्या तारखेस अंमलात येईल.

२. (१) विषयांत किंवा संदर्भात एतद्विरुद्ध काहीही नसल्यास, या अधिनियमात, — व्याख्या.

१८७९ चा मुंबई ५. (एक) "संहिता" म्हणजे, ‡ मुंबई जमीन महसूल संहिता, १८७९;

[५] [ (१-अ) "जिल्हाधिकारी" या संज्ञेत, या अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्याची कामे पार पाडण्यासाठी व त्याचे अधिकार चालविण्यासाठी राज्य सरकारने नेमलेल्या अधिकाऱ्याचा समावेश होतो;]

---

[१] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी, मुंबई सरकारचे राजपत्र, १९४९, भाग ५ (इंग्रजी), पृष्ठे २०५-२०६ पहा.

[२] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक १८ कलम २ (१), या अन्वये "मुंबई प्रांतातील" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०, अन्वये "मुंबई राज्यातील" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक १८, कलम २ (२) अन्वये "प्रांतिक सरकार" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[५] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३८, कलम ३ आणि दुसरी अनुसूची याद्वारे खंड (१-अ) समाविष्ट करण्यात आला.

* आता रत्नागिरी व सिंधुदुर्ग असे वाचावे.

† आता रायगड असे वाचावे.

‡ आता महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ पहा.

(दोन) "धारा जमीन" या संज्ञेचा अर्थ, धारेकऱ्याने धारण केलेली जमीन, असा समजावा; आणि त्या संज्ञेत, रत्नागिरी जिल्ह्यात कच्च्या धारेकऱ्याने धारण केलेल्या जमिनीचा समावेश होतो;

(तीन) "धारेकरी" या संज्ञेचा अर्थ, धारा सत्ताप्रकाराने जमीन धारण करणारा भूमिधारक, असा समजावा;

(चार) "खोत" या संज्ञेत पुढील व्यक्तीचा समावेश होतो :—

(अ) खोतकी कायदेशीररीत्या जिच्या कब्जात आहे अशी गहाण घेणारी व्यक्ती;

(ब) खोतकीतील सर्व सहहिस्सेदार;

(पाच) "खोती अधिनियम" म्हणजे, खोती भूमिव्यवस्था अधिनियम, १८८०; १८८० चा मुंबई १.

(सहा) "खोताची देणी" या संज्ञेचा अर्थ, —

(अ) रत्नागिरी जिल्ह्यातील खोती जमिनीच्या कच्च्या धारेकऱ्याकडून किंवा कायम कुळाकडून, खोती अधिनियमाच्या कलम ३३ च्या तरतुदींनुसार खोतास देण्यात येणारा खंड, आणि

(ब) कुलाबा जिल्ह्यातील खोती निसबत जमिनीच्या कोणत्याही कुळाकडून **कबुलायतीच्या** अटीनुसार किंवा खोतांच्या पट्ट्यांबाबत अधिनियम, १८६५, कलम ३८ अन्वये दिलेल्या आदेशानुसार देण्यात येणारा खोती फायदा, १८६५ चा मुंबई १.

असा समजावा; परंतु त्या संज्ञेत, अशा जमिनीच्या संबंधाने [1] [ राज्य सरकारास ] येणे असलेल्या भूमापन आकारणीच्या रकमेचा आणि मुंबई स्थानिक मंडळ अधिनियम, १९२३, कलम ९३ अन्वये बसविता येण्याजोगा उपकरांच्या रकमेचा समावेश होत नाही; १९२३ चा मुंबई ६.

(सात) "खोती खाजगी जमीन" या संज्ञेचा अर्थ, —

(अ) रत्नागिरी जिल्ह्यात, खोती निसबत जमिनीव्यतिरिक्त खोताने धारण केलेली व त्याच्या कब्जात असलेली खोती जमीन आणि खोती अधिनियमात व्याख्या केल्याप्रमाणे विशेष अधिकार असलेल्या खातेदाराने धारण केलेली जमीन, असा समजावा.

(ब) कुलाबा जिल्ह्यात, —

(एक) मूळ भू-मापनाच्या अभिलेखात खोताच्या स्वतःच्या नावाने खोती [2]** म्हणून दाखल करण्यात आलेली किंवा खोतकीतील सह-हिस्सेदाराच्या नावाने दाखल करण्यात आलेली जमीन; आणि

(दोन) मूळ भू-मापनानंतर खोताने, खोत म्हणून त्यास असलेल्या अधिकारात संपादन केलेल्या जमिनीव्यतिरिक्त त्याने खरेदी किंवा इतर कायदेशीर हस्तांतरण याद्वारे संपादन केलेली जमीन, असा समजावा;

(आठ) "खोती जमीन" या संज्ञेचा अर्थ, ज्या जमिनीसंबंधाने खोतास, खोत या नात्याने रत्नागिरी जिल्ह्यात खोती अधिनियमाच्या तरतुदींनुसार व कुलाबा जिल्ह्यात सत्ताप्रकाराच्या रूढीस अनुसरून, कोणताही हक्क होता किंवा त्याचा हितसंबंध होता ती जमीन, असा समजावा;

(नऊ) "खोती निसबत जमीन" या संज्ञेचा अर्थ, —

---

[1] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक १८, कलम २ (२) अन्वये "प्रांतिक सरकारास" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[2] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३८, कलम ३ आणि दुसरी अनुसूची याअन्वये "खाजगी" हा शब्द वगळण्यात आला.

(अ) रत्नागिरी जिल्ह्यात, खोती गावातील जी जमीन हा अधिनियम अंमलात आल्याच्या तारखेपूर्वी खोती अधिनियमाच्या कलम १० अन्वये खोतास परत मिळाली असेल ती जमीन, असा समजावा; [१] [व त्या संज्ञेत, खोती अधिनियम संमत होण्यापूर्वी महसुलाच्या अभिलेखात किंवा खोताच्या अभिलेखात खोती निसबत जमीन म्हणून दाखल करण्यात आलेल्या जमिनींचा देखील समावेश होतो];

(ब) कुलाबा जिल्ह्यात, —

(एक) खोती गावांतील जी जमीन कुळास वारसदार नसल्यामुळे किंवा कुळाने खंड देण्यात कसूर केल्याने जप्त झाल्यामुळे किंवा कुळाने राजीनामा दिल्यामुळे खोताच्या कब्जात आली असेल ती जमीन;

(दोन) मूळ भू-मापनाच्या वेळी जी जमीन खोती निसबत पडीत खाती दाखल करण्यात आली असेल आणि तेव्हापासून ती खोताच्या स्वतःच्या खर्चाव्यतिरिक्त इतर रीतीने लागवडीखाली आणली असेल ती जमीन, असा समजावा;

(दहा) "खोती गाव" या संज्ञेचा अर्थ, एखाद्या खोताचा एखाद्या गावात किंवा त्याच्या भागात किंवा त्याच्या हिश्श्यात जेथवर कोणताही हक्क किंवा हितसंबंध असेल तेथवर असे गाव, किंवा गावाचा भाग किंवा त्याचा हिस्सा, असा समजावा;

(अकरा) "कायम कूळ" म्हणजे, खोती जमिनीत जिची कायम कुळवहिवाट आहे अशी खोती जमीन धारण करणारी व्यक्ती;

(बारा) "कच्चा धारेकरी" या संज्ञेचा अर्थ, खोती अधिनियमास जोडलेल्या अनुसूचीतील पहिल्या स्तंभात नामनिर्दिष्ट केलेल्या प्रकारांपैकी कोणत्याही प्रकारचा भूमिधारक, असा समजावा.

(२) संहितेत ज्या कोणत्याही शब्दाची किंवा शब्दप्रयोगाची व्याख्या दिलेली आहे परंतु ज्यांची या अधिनियमात व्याख्या दिलेली नाही अशा कोणत्याही शब्दाचा किंवा शब्दप्रयोगाचा अर्थ, संहितेत त्यास जो अर्थ दिलेला असेल त्या अर्थाप्रमाणे असेल.

(३) खोती अधिनियमाच्या तरतुदींसंबंधी आणि खोती सत्ताप्रकारास आनुषंगिक असलेल्या गोष्टींसंबंधी या अधिनियमात केलेले उल्लेख हे, या अधिनियमाद्वारे उक्त अधिनियम रद्द करण्यात आलेला असला व उक्त सत्ताप्रकार नाहीसा करण्यात आलेला असला तरीही, हा अधिनियम अंमलात येण्याच्या निकटपूर्वी अंमलात असलेल्या उक्त तरतुदींसंबंधी व उक्त आनुषंगिक गोष्टींसंबंधी केलेले उल्लेख आहेत असे समजून त्याप्रमाणे त्यांचा अर्थ लावण्यात आला पाहिजे.

**३.** हा अधिनियम ज्या तारखेस अंमलात येईल, त्या तारखेपासून आणि त्या तारखेस, — खोती सत्ताप्रकार नाहीसा करणे.

(१) रत्नागिरी व कुलाबा जिल्ह्यात ज्या ज्या ठिकाणी खोती सत्ताप्रकार चालू असेल त्या त्या ठिकाणी तो नाहीसा करण्यात आला आहे असे समजले पाहिजे; आणि

(२) ह्या अधिनियमात स्पष्टपणे जी तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त, कोणताही कायदा, रिवाज किंवा प्रघात असला तरीही अथवा कोणतीही सनद, इनामपत्र (ग्रँट), कबुलायत किंवा पट्टा यांत किंवा कोणत्याही न्यायालयाच्या कोणत्याही हुकूमनाम्यात किंवा आदेशात, किंवा कोणत्याही इतर लेखात काहीही असले तरी, उक्त सत्ताप्रकारास आनुषंगिक असलेल्या सर्व गोष्टी नष्ट करण्यात आल्या आहेत असे समजले पाहिजे.

---

[१] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६५, कलम २ अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला होता. ही सुधारणा, सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ६, हा ज्या तारखेस अंमलात आला त्या तारखेस केलेली आहे आणि त्याच तारखेपासून अंमलात आलेली आहे असे समजण्यात येईल. (सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६५, कलम ३ पहा).

खोत, धारेकरी व कुळे ही खातेदार म्हणून असतील.

४. (१) (अ) खोती खाजगी जमिनीच्या बाबतीत, खोत हा;

(ब) धारा जमिनीच्या बाबतीत, धारेकरी किंवा कच्चा धारेकरी हा;

(क) कायम कुळाने धारण केलेल्या जमिनीच्या बाबतीत कायम कूळ हे;

(ड) (एक) खोती निसबत जमिनीच्या बाबतीत, अशी जमीन ज्याच्या कब्जात आहे असे कोणतेही कूळ हे; आणि

(दोन) अशी जमीन कोणत्याही कुळाच्या कब्जात नसेल तर, खोत हा;

त्याने धारण केलेल्या अशा जमिनीसंबंधाने येणे असलेला जमीन महसूल [१] [राज्य शासनाला] देण्याबद्दल प्रथमतः जबाबदार असेल आणि त्यास, संहिता किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेला कोणताही इतर कायदा या अन्वये खातेदार म्हणून अशा, जमिनीसंबंधाने सर्व हक्क असतील आणि तो अशा जमिनीसंबंधाने असलेल्या सर्व जबाबदाऱ्यांस पात्र असेल :

परंतु, रत्नागिरी जिल्ह्यात, खोती निसबत जमीन कब्जात असलेल्या (कायम कुळाव्यतिरिक्त इतर) कुळाच्या बाबतीत, अशा कुळाने त्या जमिनीसंबंधाने ठरविण्यात आलेल्या भूमापन आकारणीच्या सहा पटीइतके भोगाधिकार मूल्य खोतास दिल्यानंतर, त्यास खातेदाराचे हक्क प्राप्त होतील :

तसेच, कुलाबा जिल्ह्यात, खोती निसबत जमीन कब्जात असलेल्या (कायम कुळाव्यतिरिक्त इतर) कुळाच्या बाबतीत, अशा कुळाने आणि खोती निसबत जमीन ज्याच्या प्रत्यक्ष कब्जात आहे अशा खोताच्या बाबतीत, अशा खोताने, त्या जमिनीसंबंधाने ठरविण्यात आलेल्या भूमापन आकारणीच्या सहा पटीइतके भोगाधिकार मूल्य [१] [राज्य शासनास] दिल्यानंतर, त्यास खातेदाराचे हक्क प्राप्त होतील.

(२) कोणत्याही व्यक्तीने या कलमान्वये जे भोगाधिकार मूल्य द्यावयाचे असेल त्याशिवाय आणखी ती कलम ५ अन्वये रूपांतरित मूल्य देण्यास पात्र असेल.

(३) हा अधिनियम ज्या तारखेस अंमलात येईल त्या तारखेपासून, ज्या जमिनीच्या संबंधाने कोणत्याही व्यक्तीस पोट-कलम (१) अन्वये खातेदाराचे हक्क प्राप्त होतील ती जमीन तिच्या संबंधाने खोताची देणी देण्यासंबंधीच्या पात्रतेनुसार मुक्त होईल आणि अशा जमिनींतील खोताचे, खोत म्हणून त्यास असलेले सर्व हक्क नष्ट करण्यात आले आहेत असे समजण्यात येईल.

(४) कोणत्याही व्यक्तीने तिच्या कब्जातील जमिनीच्या संबंधाने दिनांक ३१ जुलै, १९५० रोजी संपणाऱ्या चालू वर्षाबद्दल खोताची जी देणी द्यावयाची असतील त्यांची रक्कम आणि उक्त जमिनीसंबंधाने कोणत्याही पूर्वीच्या वर्षाबद्दल अशा देण्यांची जी थकबाकी राहिली असेल तिची रक्कम देण्यासंबंधी अशा व्यक्तींची जी कोणतीही जबाबदारी असेल त्या जबाबदारीस पोट-कलम (३) मधील कोणत्याही तरतुदींमुळे कोणत्याही प्रकारे बाध येते असे समजता कामा नये.

खोताच्या देण्यांचे रूपांतरित मूल्य.

५. (१) कच्चा धारेकरी किंवा कायम कूळ किंवा खोती निसबत जमिनीचे कूळ हे, त्याने धारण केलेल्या जमिनीच्या बाबतीत, हा अधिनियम अंमलात येण्याच्या तारखेच्या निकटपूर्वी जी कोणतीही खोताची देणी देण्यास तो पात्र होता त्या खोताच्या देण्याचे रूपांतरित मूल्य देण्यास जबाबदार असेल; असे रूपांतरित मूल्य पोट-कलम (२) व (३) मध्ये विहित केलेल्या रीतीने अंदाजण्यात व देण्यात आले पाहिजे.

---

[१] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक १८, कलम २ (२) अन्वये "प्रांतिक सरकारला" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

(२) मामलतदाराने, पोट-कलम (१) मध्ये उल्लेख केलेल्या व्यक्तींस व खोतास विहित केलेल्या रीतीने नोटीस दिली पाहिजे आणि त्याने रीतसर चौकशी केल्यानंतर खोताच्या देण्याच्या रूपांतरित मूल्याची रक्कम ठरविली पाहिजे :

परंतु, अशी रूपांतरित मूल्याची रक्कम ही, खोताची देणी रोकड रकमेत देण्याजोगी असल्यास त्यांच्या रकमेच्या तीन पटीपेक्षा अधिक असता कामा नये किंवा अशी देणी मालाच्या स्वरूपात देण्याजोगी असल्यास; त्यांच्या किंमतीच्या तीन पटीपेक्षा अधिक असता कामा नये आणि तसेच ती रक्कम, जमिनीच्या भूमापन आकारणीच्या सहा पटीइतक्या रकमेच्या कमाल मर्यादेच्या आत असली पाहिजे. अथवा खोताची देणी पिकाच्या हिश्श्याच्या स्वरूपात देण्याजोगी असतील तर, अशा बाबतीत, पोट-कलम (३) मध्ये तरतूद केलेल्या रीतीने हिशेब करून अशा देण्याचे जे रूपांतरित मूल्य होईल त्या रूपांतरित मूल्याच्या तीन पटीपेक्षा अधिक असता कामा नये.

(३) पिकाच्या हिश्श्यांच्या स्वरूपात द्यावयाच्या खोताच्या देण्याचे रूपांतरित मूल्य अंदाजे ठरविताना पिकाचा तिसरा हिस्सा हा जमिनीसंबंधी ठरविलेल्या भूमापन आकारणीच्या दोन पटीइतका आहे असे समजले पाहिजे आणि पिकाचा इतर कोणताही हिस्सा अशा आकारणीच्या प्रमाणशीर पटीइतका आहे असे समजण्यात आले पाहिजे :

परंतु, भाताच्या लागवडीच्या संबंधात राब खताच्या कारणाकरिता प्रत्यक्ष उपयोगात आणलेल्या कोणत्याही वरकस जमिनीच्या बाबतीत द्यावयाचे उत्पन्नाचे रूपांतरित मूल्य, हे, अशा जमिनीच्या भूमापन आकारणीच्या एक पटीइतके आहे असे समजले पाहिजे.

भोगाधिकार मूल्य किंवा रूपांतरित मूल्य हे जमीन महसुलाच्या थकबाकी-प्रमाणे वसूल करता येणे.

६. कलम ४ अन्वये देण्याजोगे भोगाधिकार मूल्य व कलम ५ अन्वये देण्याजोगे रूपांतरित मूल्य यांची रक्कम, निदेशांस अनुसरून व अशा निदेशांत निर्दिष्ट केलेल्या मुदतीत मामलतदार यांजकडे अनामत ठेवण्यात आली नाही किंवा ती खोतास देण्यात आली नाही तर, अशी रक्कम जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करता येईल. अनामत ठेवलेली रक्कम किंवा वसूल केलेली रक्कम, यथास्थिती, खोतास देण्यात आली पाहिजे किंवा [१] [सरकारात] जमा करण्यात आली पाहिजे.

खोताने हिशेब वगैरे प्राधिकृत अधिकाऱ्याच्या स्वाधीन करणे.

७. (१) जेव्हा जेव्हा [२] [राज्य शासनाकडून] या बाबतीत प्राधिकृत करण्यात आलेला अधिकारी तसा निदेश देईल तेव्हा तेव्हा, खोताने रत्नागिरी जिल्ह्यात खोती अधिनियमाच्या तरतुदीन्वये आणि कुलाबा जिल्ह्यात करार-पत्रातील अटीनुसार खोती गांवांसंबंधाने त्याने ठेवलेले हिशेब व इतर अभिलेख त्या अधिकाऱ्यापुढे किंवा अशा निदेशात निर्दिष्ट करण्यात येईल अशा इतर अधिकाऱ्यापुढे हजर केले पाहिजे.

(२) वाजवी कारण नसताना असे कोणतेही हिशेब किंवा अभिलेख स्वाधीन करण्यात खोत कसूर करील तर, त्यास, सिद्धापराध ठरविण्यात आले असता दोनशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल.

---

[१] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक १८, कलम २ (३) अन्वये "बादशहाकडे" आणि "बादशहाची" या शब्दांऐवजी अनुक्रमे "सरकारांत" आणि "सरकारची" हे शब्द दाखल करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २ (२) अन्वये "प्रांतिक सरकारकडून" या शब्दांऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

असे कोणतेही हिशेब किंवा अभिलेख स्वाधीन करण्यात कसूर करणे चालू राहिल्याच्या बाबतीत, अशा पहिल्या कसुरीबद्दल सिद्धापराध ठरविण्यात आल्यानंतर ज्या ज्या दिवशी अशी कसूर चालू राहील त्या प्रत्येक दिवसाबद्दल त्यास आणखी २५ रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल.

लागवडीस न आणलेल्या व पडीत जमिनी आणि जमीन महसूल संहितेच्या कलम ३७ मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रकारची सर्व मालमत्ता [१] [शासनात] निहित होणे.

८. शंकेचे निरसन व्हावे म्हणून याअन्वये असे जाहीर करण्यात येते की, खोती गावातील ज्या कोणत्याही लागवडीस न आणलेल्या जमिनीचा व पडीत जमिनीचा कोणत्याही खोताकडून उपयोग करण्यात येत नसेल आणि हा अधिनियम अंमलात येण्याच्या तारखेपूर्वी महसूल अभिलेखात किंवा भूमापन अभिलेखात ज्याची खोती खाजगी म्हणून नोंद करण्यात आलेली नसेल अशा सर्व जमिनी, आणि तसेच, संहितेच्या कलम ३७ मध्ये उल्लेख केलेली खोती गावातील इतर सर्व प्रकारची मालमत्ता ही, जर अशी मालमत्ता व्यक्तींच्या किंवा मालमत्ता कायदेशीररीत्या धारण करण्यास समर्थ असलेल्या व्यक्तींच्या कोणत्याही समूहाच्या मालमत्ता म्हणून नसतील तर आणि अशा व्यक्तींचे त्यांत किंवा त्यांवर जे कोणतेही हक्क प्रस्थापित करण्यात येतील त्या हक्कांच्या मर्यादेपर्यंत असेल त्या व्यतिरिक्त, आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात अन्यथा जी तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त, अशा जमिनीमधील किंवा मालमत्तांतील किंवा त्यांवर असलेल्या किंवा त्याच्या संबंधात असलेल्या सर्व हक्कांसह [१] [शासनाची] मालमत्ता आहे असे समजले पाहिजे; आणि संहितेच्या यथास्थिति कलम ३७ व्या किंवा ३८ व्या कलमात तरतूद केलेल्या रीतीने आणि कारणाकरिता अधिकाऱ्यास त्यांचा विनियोग करता येईल किंवा त्या अलग राखून ठेवता येतील आणि त्यांनी तसे करणे हे कायदेशीर असेल.

जमीन परत मिळण्याचा खोताचा हक्क नष्ट करणे.

९. हा अधिनियम ज्या तारखेस अंमलात येईल त्या तारखेपासून, खोतास जमीन परत मिळण्याचा जो हक्क आहे त्या हक्कानुसार त्यास कोणत्याही खोती जमिनीत कोणताही हक्क संपादन करता येणार नाही.

**स्पष्टीकरण** — ह्या कलमाच्या प्रयोजनांकरिता, "जमीन परत मिळण्याचा हक्क" या संज्ञेचा अर्थ, ज्या हक्कानुसार खोतास, खोती अधिनियमाच्या कलम १० अन्वये, विशेष अधिकार असलेल्या खातेदाराने धारण केलेल्या जमिनी संपादन करण्याचा अधिकार देण्यात आला होता किंवा त्यास, कुलाबा जिल्ह्यात सत्ताप्रकाराच्या रूढीनुसार धारा किंवा खोती निसबत जमीन संपादन करण्याचा अधिकार देण्यात आला होता तो हक्क, असा समजावा.

झाडे वगैरे संबंधी हक्क.

१०. भारतीय वन अधिनियम, १९२७, किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्यान्वये खास राखून ठेवलेल्या झाडासंबंधीचे हक्क [१] [शासनामध्ये] निहित होतील. अशा झाडात, कोणताही करार, इनामपत्र किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कायद्यान्वये ज्या झाडांसंबंधीचा मालकी हक्क [१] [शासनाने] हस्तांतरित केला असेल त्या झाडांचा समावेश होत नाही. १९२७ चा १६

---

[१] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक १८, कलम २ (३) अन्वये "बादशहाकडे" आणि "बादशहाची" या शब्दाऐवजी अनुक्रमे "शासनात" व "शासनाची" हा मजकूर दाखल करण्यात आला.

**११.** या अधिनियमात अन्यथा स्पष्टपणे जी तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त संहितेच्या तरतुदी खोती गावांतील जमिनींना लागू होतील. जमीन महसूल अधिनियम खोती गावांतील जमिनींना लागू करणे.

***१२.** (१) ह्या अधिनियमाच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदीमुळे खोताचे किंवा कोणत्याही इतर व्यक्तींचे जमिनीतील कोणतेही हक्क नष्ट होऊन किंवा त्यांत फेरबदल होऊन त्यांचे नुकसान झाले असेल आणि असे हक्क नष्ट झाल्यामुळे किंवा त्यात फेरबदल केल्यामुळे कोणतीही जमीन किंवा अशा जमिनीतील किंवा जमिनीवरील कोणताही हक्क सार्वजनिक मालकीचा झाला आहे असे अशी व्यक्ती सिद्ध करील तर, तिला नुकसानभरपाई मिळण्यासाठी जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल. जमिनीतील कोणताही हक्क नष्ट केल्याबद्दल किंवा त्यात फेरबदल केल्याबद्दल नुकसानभरपाई देण्याची रीत.

---

*सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४० याचे कलम ३ पुढीलप्रमाणे आहे : —

३. (१) जमिनीचे सत्ताप्रकार रद्द करण्यासंबंधीच्या अधिनियमांपैकी कोणत्याही अधिनियमात काहीही असले तरी, कोणत्याही व्यक्तीचे मालमत्तेतील हक्क किंवा हितसंबंध रद्द केल्याबद्दल, नष्ट केल्याबद्दल किंवा त्यांत फेरफार केल्याबद्दल अशा व्यक्तीस पहिल्या अनुसूचीच्या स्तंभ १ मध्ये निर्दिष्ट केलेल्या अधिनियमांच्या त्या अनुसूचीच्या स्तंभ २ मध्ये निर्दिष्ट केलेल्या तरतुदींन्वये राज्य शासनाने नुकसानभरपाई म्हणून दिलेली किंवा त्यास इतर रीतीने देणे असलेली रक्कम ही, त्या रकमेतून पोट-कलम (२) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे रकमा वजा करून त्या व्यक्तीस देण्यात आली पाहिजे. नुकसान-भरपाईच्या रकमेतून जमीन महसुलाच्या थकबाकीच्या रकमा, वगैरे, वजा करणे.

(२) अशा रकमेपैकी एक-तृतीयांश रकमेतून पुढील रकमा वजा केल्या पाहिजेत व राज्य शासनाकडे जमा केल्या पाहिजेत, —

(अ) अशा मालमत्तेच्या संबंधांतील जमीन महसुलाची थकबाकी उपकर व इतर देणी यांच्या कोणत्याही रकमा संबंधित तारखेपूर्वीच्या कोणत्याही मुदतीसंबंधाने अशा व्यक्तीकडून येणे आहेत असे जिल्हाधिकाऱ्याने प्रमाणपत्र दिले असेल तर त्या जमीन महसुलाच्या थकबाकीच्या, उपकराच्या किंवा इतर देण्यांच्या सर्व रकमा;

(ब) राज्य शासनाने दिलेल्या कोणत्याही कर्जाची कोणतीही रक्कम संबंधित तारखेस परतफेड करण्यायोग्य झाल्याबद्दल जिल्हाधिकाऱ्याने प्रमाणपत्र दिले असेल तर अशी त्या कर्जाची सबंध रक्कम किंवा तिचा भाग, त्यावरील व्याज असल्यास त्या व्याजासह; आणि

(क) जमिनीचे सत्ताप्रकार रद्द करण्यासंबंधीच्या अधिनियमाचे ज्या संबंधित तरतुदी अशा व्यक्तीस लागू असतील त्याअन्वये राज्य शासनाला देण्याजोगी भोगाधिकार मूल्याची रक्कम असल्यास ती रक्कम;

मागील पोट-कलमांच्या तरतुदी या त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही ज्या तरतुदींन्वये वजा करावयाची रक्कम वसूल करण्याजोगी असेल त्या तरतुदींशिवाय आणखी असतील आणि अशा तरतुदींमुळे त्यांचे अल्पीकरण होणार नाही.

(२) असा अर्ज, या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या नियमांद्वारे विहित केलेल्या नमुन्यात [१] [ दिनांक ३१ मार्च, १९५२ रोजी किंवा त्यापूर्वी ] केला पाहिजे. [२] [ आणि जंगलाच्या उत्पन्नातील हिश्श्यावरील कोणताही हक्क नष्ट केल्याबद्दल नुकसानभरपाईच्या बाबतीत करावयाचा अर्ज दिनांक ३१ मार्च, १९६४ रोजी किंवा त्यापूर्वी केला पाहिजे ] ;

(३) संहितेअन्वये तरतूद केलेल्या रीतीने रीतसर चौकशी केल्यानंतर, जिल्हाधिकाऱ्याने त्यास वाजवी व पुरेशी वाटेल अशी नुकसानभरपाई दिली पाहिजे :

परंतु, —

(अ) रत्नागिरी जिल्ह्यात खोती गावातील जमिनी परत मिळण्याचा हक्क नष्ट केल्याबद्दल द्यावयाच्या नुकसानभरपाईची रक्कम ही, अशा जमिनीच्या प्रत्येक १०० एकरांबद्दल २ रुपये या दराने हिशेब करून येणाऱ्या रकमेपेक्षा अधिक असता कामा नये;

(ब) ज्या कोणत्याही लागवडीस न आणलेल्या जमिनीचा व पडित जमिनीचा कोणत्याही खोताकडून उपयोग करण्यात येत नसेल आणि दिनांक १ ऑगस्ट, १९४९ च्या निकटपूर्वी महसूल अभिलेखात किंवा भूमापन अभिलेखात ज्यांची खोती खाजगी म्हणून नोंद करण्यात आलेली नसेल अशा जमिनींचा उपयोग करण्याचा कोणताही हक्क नष्ट केल्याबद्दल द्यावयाच्या नुकसानभरपाईची रक्कम ही, अशा जमिनीच्या प्रत्येक १०० एकरांबद्दल ५ रुपये या दराने हिशेब करून येणाऱ्या रकमेपेक्षा अधिक असता कामा नये :

तसेच, खोताचा कोणताही इतर हक्क किंवा कोणत्याही इतर व्यक्तीचा कोणताही हक्क नष्ट केल्याच्या किंवा त्यात फेरबदल केल्याच्या बाबतीत, जिल्हाधिकाऱ्याकडून भूमि संपादन अधिनियम, १८९४, कलम २३, पोट-कलम (१) व कलम २४ यांच्या तरतुदींनुसार चालले पाहिजे : १८९४ चा १.

आणखी असे की, कोणतीही जमीन ही, धारा जमीन, खोती खाजगी जमीन किंवा खोती निसबत जमीन आहे किंवा कसे किंवा ती कायम कुळाने किंवा कोणत्याही इतर कुळाने धारण केली आहे किंवा कसे याविषयी कोणताही प्रश्न उद्भवल्यास, जिल्हाधिकाऱ्याने संहितेअन्वये तरतूद केलेल्या रीतीने रीतसर चौकशी करून त्या प्रश्नाचा निर्णय केला पाहिजे.

[३] [(३-अ) (एक) जेव्हा पोट-कलम (३) अन्वये निवाडा करणारा अधिकारी या अधिनियमान्वयेचा जिल्हाधिकारी असेल, परंतु तो संहितेच्या कलम ८ अन्वये नेमलेला जिल्हाधिकारी नसेल आणि अशा निवाड्याची रक्कम पाच हजार रुपयांहून अधिक असेल तेव्हा, उक्त निवाडा —

(अ) निवाड्याची रक्कम पंचवीस हजार रुपयांहून अधिक नसेल तर, संहितेच्या कलम ८ अन्वये नेमलेल्या जिल्हाधिकाऱ्याच्या, अथवा

(ब) निवाड्याची रक्कम पंचवीस हजार रुपयांहून अधिक असेल, परंतु एक लाख रुपयांहून अधिक नसेल तर, आयुक्ताच्या, अथवा

(क) निवाड्याची रक्कम एक लाख रुपयांहून अधिक असेल तर, राज्य सरकारच्या आगाऊ अनुमतीवाचून करता कामा नये.

---

[१] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३, कलम २, अनुसूची अन्वये "ज्या तारखेस हा अधिनियम अंमलात येईल त्या तारखेपासून सहा महिन्यांचे आत" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९६३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४३ च्या कलम २ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ९३, कलम २, अनुसूची अन्वये पोट-कलम (३-अ) दाखल करण्यात आले.

(दोन) जेव्हा पोट-कलम (३) अन्वये निवाडा करणारा अधिकारी या अधिनियमान्वयेचा जिल्हाधिकारी असेल आणि त्याचप्रमाणे तो संहितेच्या कलम ८ अन्वये नेमलेला जिल्हाधिकारीही असेल, आणि अशा निवाड्याची रक्कम पंचवीस हजार रुपयांहून अधिक असेल तेव्हा, असा निवाडा —

(अ) निवाड्याची रक्कम एक लाख रुपयांहून अधिक नसेल तर, आयुक्ताच्या; अथवा

(ब) निवाड्याची रक्कम एक लाख रुपयांहून अधिक असेल तर, राज्य सरकारच्या आगाऊ अनुमतीवाचून करता कामा नये.

१८९४ चा १. (तीन) पोट-कलम (३) अन्वयेचा प्रत्येक निवाडा भूमि-संपादन अधिनियम, १८९४ याच्या कलम २६ मध्ये विहित केलेल्या नमुन्यात असला पाहिजे.]

(४) पोट-कलम (५) च्या तरतुदींच्या अधीन राहून, जिल्हाधिकाऱ्याचा निवाडा किंवा निर्णय अखेरचा असेल.

१९५८ चा मुंबई ३१. (५) जिल्हाधिकाऱ्याच्या निवाड्यामुळे किंवा निर्णयामुळे ज्याचे नुकसान झाले असेल अशा कोणत्याही इसमास [१] [मुंबई महसूल न्यायाधिकरण अधिनियम, १९५७, अन्वये रचना करण्यात आलेल्या महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे] अपील करता येईल.

१९०८ चा ५. (६) पोट-कलम (५) अन्वये अपिलाचा निर्णय करताना, [२] [महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाने] दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, अन्वये मूळ न्यायालयाने दिलेल्या हुकूमनाम्यावर किंवा आदेशावर केलेल्या अपिलांचा निर्णय करताना न्यायालयास जे अधिकार असतील ते सर्व अधिकार वापरले पाहिजेत व न्यायालय जी कार्यरीती अनुसरते तीच कार्यरीती अनुसरली पाहिजे.

१९०८ चा ९. **१३.** ह्या अधिनियमान्वये [३] [महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे] करावयाचे प्रत्येक अपील हे जिल्हाधिकाऱ्याच्या निवाड्याच्या तारखेपासून साठ दिवसांच्या मुदतीत दाखल केले पाहिजे. भारतीय मुदत अधिनियम, १९०८*, कलमे ४, ५, १२ व १४ च्या तरतुदी असे अपील दाखल करण्याच्या बाबतीत लागू होतील. मुदतमर्यादा.

१८७० चा ७. **१४.** न्यायालय शुल्क अधिनियम, १८७०**, यात काहीही असले तरी, या अधिनियमान्वये न्यायालय [३] [महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे] केलेल्या प्रत्येक अपिलावर विहित करण्यात येईल अशा किमतीचा न्यायालय शुल्क मुद्रांक लावला पाहिजे. न्यायालय शुल्क.

---

[१] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०, अन्वये "मुंबई महसूल न्यायाधिकरण अधिनियम, १९३९ अन्वये रचना करण्यात आलेल्या मुंबई महसूल न्यायाधिकरणाकडे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील आदेशाअन्वये "मुंबई महसूल न्यायाधिकरणाने" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील आदेशाद्वारे "मुंबई महसूल न्यायाधिकरणाकडे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

* आता मुदतमर्यादा अधिनियम, १९६३ (१९६३ चा ३६) पहा.

** आता, मुंबई न्यायालय शुल्क अधिनियम, १९५९ (१९५९ चा मुंबई ३६) पहा.

सन १९५८चा मुंबई अधिनियम क्रमांक ९३, याच्या प्रारंभापूर्वी केलेल्या निवाड्यांच्या संबंधात पुनरीक्षणाचे अधिकार.

[१] [ **१४-अ.** जेव्हा, मुंबई भू-सत्ताप्रकार नाहीसे करण्याबाबत (सुधारणा) अधिनियम, १९५८, हा अंमलात येण्यापूर्वी कलम १२, पोट-कलम (३) अन्वये कोणताही निवाडा करण्यात आला असेल आणि कलम १२, पोट-कलम (५) अन्वये अशा निवाड्याविरुद्ध कोणतेही अपील दाखल करण्यात आले नसेल तेव्हा, कलम १२, पोट-कलम (४) यात काहीही असले तरी, राज्य सरकारास, अशा निवाड्यासंबंधीच्या चौकशीचा किंवा कामकाजाचा कायदेशीरपणा, सयुक्तिकता किंवा नियमबद्धता याविषयी स्वतःची खात्री करून घेण्याच्या कारणांकरिता अशा चौकशीचे किंवा कामकाजाचे कागदपत्र मागविता येतील आणि हितसंबंधित पक्षकारांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर, अशा चौकशीच्या किंवा कामकाजाच्या कायदेशीरपणाविषयी, सयुक्तिकतेविषयी किंवा नियमबद्धतेविषयी त्याची खात्री झाली नाही, तर त्यास, निवाडा रद्द ठरविता येईल आणि नव्याने निवाडा करण्याविषयी जिल्हाधिकाऱ्यास निदेश देता येईल आणि त्यानंतर निवाडा करण्यासंबंधीच्या, अशा निवाड्याच्या निर्णायकत्वासंबंधीच्या आणि अशा निवाड्याविरुद्ध करावयाच्या अपिलासंबंधींच्या, या अधिनियमाच्या सर्व तरतुदी योग्य त्या फेरफारांनिशी, अशा नवीन निवाड्यास लागू होतील.] १९५८ चा ९३.

सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६७, याच्या तरतुदी खोत व कुळे यांच्या संबंधांस लागू असणे.

**१५.** मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ यांच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदी कोणत्याही खोती जमिनींच्या बाबतींत किंवा खोत व त्याची कुळे यांचे परस्पर हक्क व जबाबदाऱ्या याच्या बाबतीत लागू होण्यास या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींमुळे कोणत्याही प्रकारे बाध येते असे समजता कामा नये; मात्र, उक्त तरतुदी या अधिनियमाच्या स्पष्ट तरतुदींशी कोणत्याही रीतीने विसंगत नसतील तेथवरच त्या अशा रीतीने लागू होण्यास बाध येणार नाही. १९४८ चा मुंबई ६७.

नियम. **१६.** या अधिनियमाच्या तरतुदींची अंमजबजावणी करण्याच्या कारणासाठी [२] [ राज्य सरकारास ] नियम करता येतील. असे नियम, ते कायम करण्यापूर्वी आगाऊ प्रसिद्ध करण्यात येतील आणि ते कायम करण्यात आल्यावर **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात आले पाहिजेत.

निरसन. **१७.** अनुसूचित निर्दिष्ट केलेले अधिनियम हे, त्या अनुसूचीच्या स्तंभ ४ मध्ये निर्दिष्ट केलेल्या मर्यादेपर्यंत या अन्वये, निरसित करण्यात आले आहेत :

परंतु, उक्त अधिनियम निरसित केल्यामुळे आणि खोती सत्ताप्रकारास आनुषंगिक असलेली कोणतीही गोष्ट नष्ट करण्यात आली असल्याचे जाहीर करण्यासंबंधीच्या तरतुदीमुळे हा अधिनियम अंमलात येण्याच्या तारखेस अनिर्णीत असलेल्या कोणत्याही कायदेशीर कामकाजास कोणत्याही रीतीने बाध येणार नाही आणि जणू हा अधिनियम संमत करण्यात आला नव्हता असे समजून, असे कोणतेही कायदेशीर कामकाज चालू ठेवण्यात आले पाहिजे व अखेरचे निकालात काढण्यात आले पाहिजे.

---

[१] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ९३ कलम २, अनुसूची अनुसार कलम १४-अ जादा दाखल करण्यात आले.

[२] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक १८, कलम २ (२) अन्वये "प्रांतिक सरकारास" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

# अनुसूची

(कलम १७ पहा.)

| वर्ष<br>१ | क्रमांक<br>२ | लघु संज्ञा<br>३ | कोठवर रद्द केला ते<br>४ |
|---|---|---|---|
| १८६५ | १ | खोताच्या पट्ट्याबाबत अधिनियम, १८६५ ... | कलमे ३७ व ३८. |
| १८७९ | ५ | मुंबई जमीन महसूल संहिता, १८७९ ... | कलम ११४. |
| १८८० | १ | खोती भूमिव्यवस्था अधिनियम, १८८० ... | संपूर्ण. |

शा. मु. वाई,–७,००० पु.–१०-२०१२–एच-२०१*

# पुरवणी नंबर ४

तारीख / / २०० रोजी भरलेल्या वार्षिक साधरण सभेच्या ठरावाने मंजूर झालेल्या दुरूस्त व नवीन पोटनियमांची नक्कल

| दुरूस्त झालेल्या नवीन पोट नियमाचा अनुक्रम नंबर | दुरूस्त झाल्यानंतर नवीन होणाऱ्या पोटनियमांची शब्दयोजना |
|---|---|
| ६० | प्रत्येक सदस्यास त्याच्या एकूण पगाराच्या १२ पट परंतु जास्तीत जास्त रुपये ९०,०००/– पैकी जी कमी असेल तेवढी रक्कम सर्वसाधारण कर्ज म्हणून मिळू शकेल व ती जास्तीत जास्त ६० हप्त्यात परत फेड केली पाहिजे. |

**टीप** – सदरच्या चार प्रती जोडल्या आहेत.

सचिव मॅ. कमेटीचे सभासद चेअरमन

# महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

- **संचालक**
  मुद्रण लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय,
  **महाराष्ट्र राज्य**
  नेताजी सुभाष मार्ग, मुंबई - ४०० ००४.

- **पर्यवेक्षक**
  **शासकीय ग्रंथागार**
  (केंद्र शासनाच्या व महाराष्ट्र राज्य शासनाच्या प्रकाशनाकरिता)
  (फक्त स्थानिक विक्रीकरिता)
  युसुफ बिल्डिंग, दुसरा मजला, खो. नं. २१,
  वीर नरीमन रोड (हुतात्मा चौकाजवळ),
  मुंबई-४०० ००१
  .

- **व्यवस्थापक**
  शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार
  फोटोझिंको मुद्रणालय आवार,
  जी. पी. ओ. नजिक, पुणे - ४११ ००१.

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार
  सिव्हील लाईन्स, नागपूर - ४४० ००१.

- **पर्यवेक्षक**
  शासकीय ग्रंथागार
  शहागंज, गांधी चौकाजवळ,
  औरंगाबाद - ४३१ ००१.

आणि

**महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते**